# जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सोलापूर
## नेहरु नगर, विजापूर रोड, सोलापूर-४१३००४
District Deputy Commissioner of Animal Husbandry, Solapur
Neharu Nagar, Vijapur Road, Solapur-413004
☎(०२१७)२३४२६९६ Email.ddcahsolapur@gmail.com


जा.क्र. जिपउआ/सो/तां/ ७५६२ /२०१९ सोलापूर-०४ दि. २ /१२/२०१९

**प्रति,**

**मा.आयुक्त पशुसंवर्धन,**
**पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे-६७**

**विषय-**जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र सोलापूर या कार्यालयातील निरूपयोगी द्रवनत्रपात्रांची विक्री लिलाव प्रक्रियेदवारे करणेसाठी जाहीर लिलावाची जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन पशुसंवर्धन विभाग सोलापूर अंतर्गत जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र सोलापूर अंतर्गत निरुपयोगी द्रवनत्र पात्रांची विक्री लिलाव प्रक्रियेद्वारे करावयाची आहे. सदरची लिलाव प्रक्रिया दिनांक- दि १७ डिसेंबर २०१९ रोजी दुपारी २ :०० वाजता करावयाची आहे.तरी सोबत जोडल्याप्रमाणे लिलावाची सुचना पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र राज्य, यांच्या वेबसाईटवर दि. ४ डिसेंबर २०१९ ते १५ डिसेंबर २०१९ या कालावधीमध्ये प्रसिध्द करावी ही विनंती.

सोबत- प्रसिध्द करावायाच्या लिलाव सुचनेचा प्रारुप

**(डॉ.एन.ए.सोनवणे)**
**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त**
**सोलापूर**

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सोलापूर**
**नेहरु नगर, विजापूर रोड, सोलापूर-४१३००४**
**District Deputy Commissioner of Animal Husbandry, Solapur**
**Neharu Nagar, Vijapur Road, Solapur-413004**
☎(०२१७)२३४२६९६ Email.ddcahsolapur@gmail.com

## जाहिर लिलाव

निरुपयोगी द्रवनत्र पात्रे खरेदी करणाऱ्या इच्छुक खरेदीदार व्यक्ती/कंपन्या/व्यापारी/खरेदीदार संस्था यांना सुचित करण्यात येते की, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, कार्यालय सोलापूर अंतर्गत जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, सोलापूर या कार्यालयातील निरुपयोगी, निर्लेखीत केलेल्या खालील प्रमाणे विविध क्षमतेच्या द्रवनत्र पात्रांची जाहिर लिलावाद्वारे विक्री करावयाची आहे. सदर द्रवनत्र पात्रे इच्छुकांना ज्या स्थितीत आहेत त्याच स्थितीत पाहण्यासाठी कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. लिलावाच्या साहित्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| **लिलावाच्या साहित्याचा सविस्तर तपशील** | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **जाहिर लिलाव दिनांक** | **द्रवनत्र पात्रांचा प्रकार/ तपशील** | **संख्या** |
| १ | १७ डिसेंबर २०१९ | BA-3 | ९८ |
| २ | | BA-20 | ११ |
| ३ | | BA-1.5 | ८ |
| ४ | | IR-3 | ७० |
| ५ | | AL-3 | ३ |
| ६ | | IN-50 | ४६ |
| ७ | | TA-55 | ७८ |
| | | **एकूण** | **३१४** |

त्याकरीता दिनांक १७ डिसेंबर २०१९ रोजी दुपारी २:०० वाजता जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय, सोलापूर नेहरु नगर, शासकीय सधन कुक्कुट प्रकल्पा शेजारी येथे जाहिर लिलाव करण्यात येत आहे. ज्या व्यक्ती/कंपन्या/व्यापारी/खरेदीदार संस्था यांना निरुपयोगी द्रवनत्र पात्रे खरेदी करावयाची असतील त्यांनीच सदर लिलावात भाग घ्यावा. सदर लिलावात भाग घेण्यासाठी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सोलापूर यांच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेचा रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) चा धनाकर्ष (डिमांड ड्राप्ट) Payble at Solapur सादर करणे आवश्यक आहे. जाहिर लिलावासाठी गठित जिल्हास्तरीय समितीचा निर्णय अंतिम असेल. लिलावानंतर विक्री करावयाची द्रवनत्र पात्रे हि चेपून मगच अंतिम लिलाव मंजुर झालेल्या व्यक्ती/कंपन्या/व्यापारी/खरेदीदार संस्था यांना हस्तांतरीत करण्यात येतील, जेणेकरुन त्यांचा पुर्नवापर करणे शक्य होणार नाही.

**(डॉ.एन.ए.सोनवणे)**
**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त**
**सोलापूर**